R.No. MHAMAR/25/A3029

दैनिक

E-mail : dainikmhavratt@gmail.com

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ७५

दि.०३ मार्च २०२६,वार: मंगळवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

# महावृत्त

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## लातूर येथे फाल्गुन पौर्णिमेनिमित्त धम्मदेशना कार्यक्रम





लातूर : बौद्ध धम्म संस्कार प्रशिक्षण चॅरिटेबल ट्रस्ट, लातूर यांच्या वतीने फाल्गुन पौर्णिमेनिमित्त विशेष धम्मदेशना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम मंगळवार, दि. ३ मार्च २०२६ रोजी दुपारी ठीक १२.०० वाजता महाविहार धम्म केंद्र, सातकर्णी नगर, बार्शी रोड, रामेगाव, ता. जि. लातूर येथे होणार आहे.

कार्यक्रमाची सुरुवात दुपारी १२ वाजता त्रिसरण पंचशील व सामूहिक बुद्ध वंदनेने होईल. या प्रसंगी प्रमुख धम्मदेशना पू. भिक्खु पट्टानंद थेरो आणि पू. भन्ते बोधिराज यांच्याकडून दिली जाणार आहे.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मा. उपा कांबळे (जि. प. सदस्य रोहिणी गट व माजी नगराध्यक्ष उदगीर), मा. दिपाली प्रदीप आदमाने (जि. प. सदस्य निवळी गट, लातूर) आणि मा. अमोल दासराव देडे (सदस्य पंचायत समिती, लातूर) उपस्थित राहणार आहेत.

तसेच भोजनदान दाते म्हणून उपा. शेषेराव सखाराम सूर्यवंशी व उपा. सुजाता पंडित सूर्यवंशी (एल. आय. सी. कॉलनी, लातूर) यांचे सहकार्य लाभणार आहे.

या धम्मदेशना कार्यक्रमास सर्व बौद्ध उपासक-उपासिका यांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन भिक्खू पयानंद थेरो यांनी केले आहे.

## ज्येष्ठ विचारवंत, माजी कुलगुरू, माजी नगराध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे यांचे निधन



लातूर :-मराठवाड्याच्या शैक्षणिक, सामाजिक आणि साहित्यिक चळवळीचे आधारस्तंभ, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे संस्थापक कुलगुरू आणि माजी राज्यसभा खासदार प्रा. डॉ. जनार्दन वाघमारे यांचे आज वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या जाण्याने केवळ मराठवाड्याचीच नव्हे, तर महाराष्ट्राची मोठी बौद्धिक हानी झाली असून संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

उद्या कवठा येथे अंत्यसंस्कार डॉ. वाघमारे यांच्या पार्थिवावर उद्या, मंगळवारी (३ मार्च २०२६) सकाळी ११:०० वाजता त्यांच्या मूळ गावी कवठा (ता. कंधार) येथील शेतात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व डॉ. जनार्दन वाघमारे यांनी शिक्षण, राजकारण आणि समाजकारण या तिन्ही क्षेत्रांत आपला वेगळा ठसा उमटवला. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाची पायाभरणी करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. राज्यसभा खासदार म्हणून त्यांनी दिल्लीत मराठवाड्याचे प्रश्न आणि सामाजिक न्यायाचा आवाज प्रभावीपणे मांडला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचे भाष्यकार म्हणून त्यांची जगभर ओळख होती. दलित, वंचित आणि बहुजन समाजाच्या उत्थानासाठी त्यांनी आयुष्यभर लेखणी आणि वाणीच्या माध्यमातून प्रबोधन केले.

राजकीय व सामाजिक क्षेत्रातून शोक व्यक्त डॉ. वाघमारे यांच्या निधनाची बातमी समजताच राज्याचे मुख्यमंत्री, मंत्रिमंडळातील सदस्य, विविध पक्षांचे खासदार आणि आमदारांनी तीव्र शोक व्यक्त केला आहे. मराठवाड्याने एक विद्वान शिक्षक, प्रबोधनवादी विचारवंत आणि समाजहिताची जाणीव असलेला ऋषितुल्य नेता गमावला आहे, अशा भावना मान्यवरांनी व्यक्त केल्या आहेत.

## एन.एम.एम.एस.परिक्षेमध्ये वाघेबाभुळगाव जि.प.शाळेचे घवघवीत यश!



केज/प्रतिनिधी.-शैक्षणिक वर्ष २०२५- २६ मध्ये घेण्यात आलेल्या एन. एम. एम. एस. परीक्षेमध्ये केज तालुक्यातील वाघेबाभुळगाव येथील जिल्हा परिषद (अनु.) माध्यमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी शासनाच्या आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक क्षेत्रात आर्थिक मदत व्हावी.या उद्देशाने राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी सुरू असलेल्या एन.एम.एम.एस. परीक्षेत घवघवीत यश संपादन करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. यावर्षी शाळेच्या एकूण १८ विद्यार्थ्यांनी वरील परिक्षेसाठी सहभाग घेतला होता.त्यापैकी ९ विद्यार्थी या परीक्षेत उत्तीर्ण झाले असून, राष्ट्रीय विज्ञान दिनाचे औचित्य साधून वाघेबाभुळगाव येथील जिल्हा परिषद (अनु) शाळेच्या वतीने या उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा विशेष सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता.मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार सोहळा शाळेचे मुख्याध्यापक श्री. धनगर सर यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पंचायत समिती सदस्य मा. श्री. प्रेमचंद कोकाटे, माजी सरपंच श्री.रामदासजी वाघ, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. दिलीप झांबरे, केंद्रीय प्राथमिक शाळेचे शा.व्य.स. उपाध्यक्ष श्री. गणेश भोजने, पत्रकार मा. श्री. राजेभाऊ हांडगे, बाळासाहेब जाधव व श्री. गणेश हावळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.या परीक्षेत शाळेतील या नऊ विद्यार्थ्यांनी यश मिळवले

१). आरती रामराव बिक्कड
२). आरुषी रामदास वाघ
३). सानिका विलास नेहरकर
४). श्वेता दत्ता सोनके
५). सृष्टी संतोष जाधव
६). श्रवण संदीप इंगोले
७). शिवतेज परमेश्वर स्वामी
८). कु. श्रद्धा किरण जाधव
९). कु. अक्षरा रमेश पंडित

या सर्व विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा मुख्याध्यापक व शिक्षक वृंद यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून यशाचे रहस्य उलगडले, तर पालक प्रतिनिधी श्री. संदीप इंगोले यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.मार्गदर्शन आणि संकल्पकार्यक्रमात पत्रकार राजेभाऊ हांडगे व प्रेमचंद कोकाटे यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. शाळेचे शिक्षक श्री. ढेंगळे सर,श्रीमती.राख मॅडम, श्री. डोईफोडे सर व श्री. आरकडे सर यांनी स्पर्धा परीक्षेचे महत्त्व पटवून दिले. या यशाबद्दल सर्व स्तरातून वाघेबाबुळगाव शाळेचे कौतुक होत असून मुख्याध्यापक आणि त्यांचे सर्व सहकारी शिक्षक वृंद यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.

पालकांचे सहकार्य आणि विद्यार्थ्यांची जिद्द यांच्या जोरावर ही शाळा पंचक्रोशीत 'आदर्श शाळा' म्हणून नावारूपास येईल. कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन करताना, 'शाळेला गावचा आधार व गावाला शाळेचा अभिमान' ही उक्ती सार्थ ठरत असल्याचे नमूद करण्यात आले. तर अशा प्रकारचे शाळेच्या विद्यार्थ्यांनी यश संपादन करणे ही अभिमास्पद बाब असुन मी व माझ्या शाळेचे माझे सर्व सहकारी यापुढेही गावचा शैक्षणिक विकास कसा करता येईल याकडे अधिक लक्ष देवून.शाळेतुन उत्कृष्ट विद्यार्थी घडवुन शाळेचे आणि गावाचे नाव नक्कीच उज्वल करु. ----श्री.धनगर सर (मुख्याध्यापक)

## ज्येष्ठ विचारवंत डॉ वाघमारे यांचे कार्य. कायम स्मरणात राहणारे - आ. कराड





लातूर- शिक्षणतज्ञ, ज्येष्ठ विचारवंत, साहित्याचे अभ्यासक, राजकारणाशी समाजकारणीची जोड देऊन कार्य करणारे लातूर पॅटर्नचे जनक माजी खासदार, माजी कुलगुरू डॉ. जनार्धन वाघमारे यांचे कार्य कायम स्मरणात राहणारे असल्याचे सांगून भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी त्यांच्या दुःखद निधनाबद्दल भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

लातूरचे पहिले लोकनियुक्त नगराध्यक्ष म्हणून डॉ. जनार्दन वाघमारे यांनी लातूरच्या विकासासाठी मोठे प्रयत्न केले, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून प्रभावी कार्य केले संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेल्या लातूरच्या शाहू महाविद्यालयाच्या उभारणीत त्यांचा मोलाचा वाटा असून शिक्षण क्षेत्रातील लातूर पॅटर्नचे जनक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. खासदार म्हणून राज्यसभेवर डॉ. वाघमारे सरांना काम करण्याची संधी मिळाली. शिक्षण सामाजिक न्याय आणि वंचित घटकाच्या प्रश्नावर त्यांनी संसदेच्या सभागृहात प्रभावीपणे भूमिका मांडली असेही आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखवले.

राज्य नियोजन मंडळाचे सदस्य आणि मानव संसाधन तसेच कृषी क्षेत्र संसदीय स्थायी समिती सदस्य म्हणून उल्लेखनीय कार्य केले आहे. सामाजिक परिवर्तनाच्या कार्यासाठी स्वतः ला वाहून घेतलेल्या ज्येष्ठ विचारवंत डॉ. जनार्धन वाघमारे यांनी पुरोगामी साहित्य चळवळीवर सखोल अभ्यासपूर्ण लेखन आणि संशोधन केले असून शिक्षणाचा विस्तार तळागाळापर्यंत व्हावा यासाठी सातत्याने प्रयत्नशील होते.

शिक्षणतज्ञ डॉ. जनार्धन वाघमारे यांचे कार्य कायम स्मरणात राहणारे आहे. डॉ वाघमारे सर आणि डॉ. वि. दा. कराड सर यांचे व कराड कुटुंबीयाचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. आज सोमवारी सकाळी लातूर येथील निवासस्थानी त्यांचे दुःखद निधन झाले. या दुःखद निधनाबद्दल भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो आणि वाघमारे परिवारास या दुःखातून सावरण्याचे बळ मिळो अशी प्रार्थना केली.

## कोणत्याही खाजगी अथवा अनधिकृत / शालेय परवाना नसलेल्या वाहनातून शालेय विद्यार्थ्यांच्या पालकांना आपल्या पाल्यास शाळेत पाठवू नये

ठाणे(जिमाका) :- बदलापूर पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद क्र. ५६/२०२६, दि.२५ फेब्रुवारी २०२६, बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण अधिनियम २०१२, कलम १२, ८. तसेच भारतीय न्याय संहिता (बी.एन.एस.) कलम ७४, ७५, ७९ नुसार नोंदविण्यात आला आहे. या गुन्हयातील आरोपी वाहनचालक इसम नामे जयेश काळूराम मुने हा असून गुन्ह्यात वापरण्यात आलेले वाहन मोटार बस क्र. चक-०५न-०७५४ हे बस संवर्गातील वाहन आहे. या अत्याचाराची घटना नमूद वाहनांमध्ये झाल्याची नोंद एफ.आय.आर. मध्ये करण्यात आले आहे. तसेच गुन्ह्यातील जप्त वाहनास मोटार वाहन नियमाप्रमाणे रु.१९ हजार ५००/- दंडात्मक कारवाई करून वाहनाची नोंदणी निलंबन करण्याकरिता वाहनमालकास कारणे दाखवा नोटीस जारी करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे गुन्ह्यातील आरोपी वाहनचालक यांची अनुज्ञप्ती निलंबित करण्यात आली आहे.

माहे एप्रिल २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या कालावधीत एकूण ७३० वाहनांवर स्कुलबस नियमाप्रमाणे कारवाई करून रु.११ लाख ३२ हजार २५०/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

तरी कोणत्याही खाजगी अथवा अनधिकृत / शालेय परवाना नसलेल्या वाहनातून सर्व शालेय विद्यार्थ्यांच्या पालकांनी त्यांच्या पाल्यास विद्यार्थ्यांना शाळेत पाठवू नये, असे आवाहन कल्याणचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी आशुतोष बारकुल यांनी केले आहे.

## शिक्षण, राजकारण, समाजकारण यांना जोडणारा मार्गदर्शक दुवा निखळला- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई: विद्वत्ता, तत्वनिष्ठ आणि लोकाभिमुखता यांचा त्रिवेणी संगम असलेल्या माजी खासदार प्रा. डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या निधनामुळे शिक्षण, राजकारण आणि समाजकारण यांना जोडणारा मार्गदर्शक असा दुवा निखळला आहे, अशा शोकभावना व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ विचारवंत, माजी खासदार, माजी कुलगुरू डॉ. जनार्दन वाघमारे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

शोकसंदेशात मुख्यमंत्री म्हणतात, प्रा. डॉ. वाघमारे यांचा इंग्रजी भाषा आणि साहित्यासह अर्थशास्त्र, राज्यशास्त्राचा सखोल अभ्यास होता. शैक्षणिक क्षेत्रात त्यांनी अध्यापन आणि प्रशासन या अंगाने मोठा ठसा उमटवला. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू म्हणूनही त्यांनी प्रभावी कार्य केले. विशेष म्हणजे त्यांनी लातूरचे पहिले लोकनियुक्त नगराध्यक्षपदही भुषविले. या काळात त्यांनी शहराच्या विकासासाठी लातूर व्हिजन म्हणून आराखडा तयार केला. शहरातील स्वच्छता, पाणी पुरवठा तसेच नागरी सुविधांसाठी प्रयत्न केले. त्यामुळे लातूरला त्यावेळी संत गाडगेबाबा नागरी स्वच्छता अभियानात प्रथम पुरस्कारदेखील मिळाला होता. राज्यसभा सदस्य म्हणूनही त्यांनी विविध संसदीय समितीवर काम केले. लातूरचे किल्लारी भूकंपशास्त्र संशोधन आणि नांदेड - किनवटच्या आदिवासी संशोधन आणि अभ्यास केंद्रांच्या स्थापनेत त्यांचा पुढाकार होता. त्यांना संयुक्त राष्ट्र संघाच्या अधिवेशनात भारताच्या प्रतिनिधी मंडळाचा सदस्य म्हणून म्हणणे मांडण्याची संधी मिळाली होती. त्यांनी वैविध्यपूर्ण विषयांवर विपुल साहित्य निर्मिती केली. त्यांची ही ग्रंथसंपदा आपल्या सर्वांसाठी एक प्रकारचे संचित आहे.

ज्येष्ठ विचारवंत डॉ वाघमारे यांच्या निधनामुळे शिक्षण, राजकारण आणि समाजकारण यांना जोडणारा मार्गदर्शक असा दुवा निखळला आहे. ही सामाजिक क्षेत्राची हानी आहे. आपण वाघमारे कुटूबिंयाच्या दुःखात सहभागी असून, ईश्वराने त्यांना हा आघात सहन करण्याची क्षमता द्यावी अशी प्रार्थना करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डॉ. वाघमारे यांना श्रद्धांजली अर्पण केली.

## इराणइझराइल तणाव: युद्धविरामाच्या शक्यता आणि मध्यपूर्वेचे भवितव्य

मध्यपूर्वेतील राजकारण पुन्हा एकदा धगधगत आहे. इराण आणि इझराइल यांच्यात वाढलेला तणाव हा केवळ दोन देशांमधील संघर्ष नसून तो संपूर्ण प्रदेशाच्या स्थैर्याला आव्हान देणारा आहे. या पार्श्वभूमीवर युद्धविराम होणार का? हा प्रश्न जागतिक स्तरावर चर्चेत आहे. सध्याच्या घडामोडी पाहता तात्पुरता तणाव कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही; मात्र दीर्घकालीन शांततेचा मार्ग अजूनही खडतर दिसतो.

इराणइझराइल संघर्षाची मुळे खोलवर रुजलेली आहेत. इझराइलला इराणच्या अणुकार्यक्रमाबाबत गंभीर सुरक्षा चिंता आहे. इराण अण्वस्त्र क्षमता विकसित करेल, अशी भीती इझराइल अनेक वर्षांपासून व्यक्त करत आहे. दुसरीकडे, इराण इझराइलला प्रादेशिक अस्थिरतेसाठी जबाबदार ठरवतो आणि पॅलेस्टिनी प्रश्नात इझराइलच्या धोरणांवर तीव्र टीका करतो. या परस्पर अविश्वासामुळे दोन्ही देशांमध्ये थेट संवाद जवळपास शून्य आहे.

अलीकडील काळात तणावाची तीव्रता वाढण्यामागे प्रॉक्सी संघर्ष हा मोठा घटक ठरला आहे. लेबनॉनमधील हिझ्बुल्ला, सीरियातील इराण समर्थित गट आणि गाझा पट्टीतील घडामोडी यामुळे परिस्थिती अधिक गुंतागुंतीची बनली आहे. इझराइल अनेकदा या गटांवर कारवाई करत असतो, तर इराण त्यांना राजकीय व लष्करी पाठबळ देत असल्याचे आरोप होतात. त्यामुळे संघर्षाचे स्वरूप बहुपदरी झाले आहे.

युद्धविरामाच्या शक्यतेकडे पाहताना आंतरराष्ट्रीय दबाव हा निर्णायक घटक ठरू शकतो. अमेरिका, युरोपीय देश आणि संयुक्त राष्ट्रसंघ या सर्वांना मध्यपूर्वेत मोठे युद्ध टाळायचे आहे. तेलपुरवठा, जागतिक व्यापारमार्ग आणि प्रादेशिक सुरक्षा यावर होणारा परिणाम लक्षात घेता मोठ्या संघर्षाला आळा घालण्यासाठी राजनैतिक प्रयत्न सुरू असल्याचे संकेत मिळतात. विशेषतः अमेरिकेची भूमिका महत्त्वाची आहे, कारण ती इझराइलची प्रमुख सहयोगी आहे आणि इराणवर निर्बंधांच्या माध्यमातून दबाव टाकण्याची तिची क्षमता मोठी आहे.

तथापि, केवळ बाह्य दबावामुळे स्थायी युद्धविराम होईल, असे मानणे धोकादायक ठरेल. दोन्ही देशांच्या अंतर्गत राजकारणाचाही विचार करावा लागतो. इराणमध्ये क्रांतिकारी विचारसरणीचा प्रभाव अजूनही मजबूत आहे, तर इझराइलमध्ये सुरक्षाविषयक मुद्दे राजकारणाच्या केंद्रस्थानी आहेत. अशा परिस्थितीत कोणतीही मवाळ भूमिका देशांतर्गत राजकीय विरोधाला सामोरी जाऊ शकते.

आर्थिक घटकही महत्त्वाचे आहेत. इराणवर आधीपासूनच कठोर आर्थिक निर्बंध आहेत, तर इझराइललाही दीर्घकालीन युद्ध परवडणारे नाही. त्यामुळे मर्यादित संघर्ष ठेवण्याची आणि परिस्थिती नियंत्रणात ठेवण्याची दोन्ही बाजूंची प्रवृत्ती दिसते. यामुळे अनौपचारिक युद्धविराम किंवा तणाव नियंत्रित ठेवण्याची पद्धत पुढेही कायम राहू शकते.

भविष्यातील चित्र मिश्र स्वरूपाचे आहे. अल्पकालीन दृष्टीने पूर्ण युद्ध टळण्याची शक्यता जास्त आहे, कारण त्याचे परिणाम सर्वांसाठी विनाशकारी ठरू शकतात. मात्र, प्रॉक्सी हल्ले, सायबर कारवाया आणि मर्यादित लष्करी चकमकी सुरू राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. खरा आणि टिकाऊ युद्धविराम साध्य करायचा असेल तर व्यापक प्रादेशिक संवाद, अणुकार्यक्रमावर स्पष्ट करार आणि पॅलेस्टिनी प्रश्नात प्रगती आवश्यक ठरेल.

शेवटी, इराणइझराइल तणाव हा एका कराराने संपणारा प्रश्न नाही. तो इतिहास, विचारसरणी आणि सामरिक स्पर्धेने गुंफलेला आहे. त्यामुळे निकट भविष्यात तात्पुरते तणावशमन शक्य असले तरी स्थायी शांततेसाठी दीर्घकालीन आणि प्रामाणिक राजनैतिक प्रयत्न अपरिहार्य ठरणार आहेत. मध्यपूर्वेतील शांतता अजूनही नाजूक धाग्यावर टांगलेली आहेआणि जगाचे लक्ष तिकडेच लागलेले आहे.

# धुळवड लोकोत्सव हा सामाजिक एकतेचे प्रतिक

फाल्गुन हा शालिवाहन शके महिन्यातील शेवटचा महिना आहे. त्यामुळे होळी हा हिंदू दिनदर्शिकेनुसार येणा-या महिन्यातील शेवटचा सण असतो. होळी पेटवून दुस-या दिवशी म्हणजे धुलीवंदनाच्या दिवशी जमिनीला, मातीला नमस्कार करण्याची प्रथा आहे.
प्रत्येक प्राणी मात्राचा देह हा पंचमहाभूतांपासून बनलेला असतो. पृथ्वी, आप, त्वज, वायू, आकाश असा या पंचमहाभूतांचा क्रम आहे. पृथ्वी पासून सुरुवात आणि आकाशापर्यंत शेवट असे पंचक असणा-या या तत्त्वांना आपल्या सणांच्या मधून आदर व्यक्त करण्याचा एक दिवस म्हणजे धूलिवंदन. यादिवशी पृथ्वीला वंदन केले जाते. त्यानंतर १५ दिवसांनी नववर्षाला म्हणजे पाडव्याच्या दिवशी आकाशाला भिडणारी गुढी उभारण्याची पद्धत आहे.



या दिवशी सकाळी घरातील बायका पाण्याची तपेली, घागरी, हंडे पाण्याने भरुन होळी पेटवलेल्या जागी ठेवतात. सूर्याच्या उन्हाने हे पाणी तापते. या पाण्याने लहान मुलांना आंघोळ घालतात. असे मानले जाते की या पाण्याने आंघोळ केली असता लहान मुलांना किंवा कोणालाही उन्हाळा बाधत नाही. या दिवसात कै-याही मिळू लागतात. कै-या उकडून त्याचा गर लहान मुलांना अंगाला लावून स्नान घालतात. मोठी माणसे होळीवर पाणी शिंपडून ती राख कपाळाला लावतात, अंगाला फासतात व नंतर स्नान करतात.

काही ठिकाणी आजकाल लोकांनी आपापल्या सोयीनुसार होळीच्या दुस-या दिवशी रंगपंचमी साजरी करण्याची प्रथा सुरु केली आहे. त्यात लहान-मोठे, स्त्रिया-पुरुष सरसकट सगळे उत्साहाने रंग खेळतात. परंतु रंगपंचमी हा वेगळा सण आहे. वसंत ऋतूची चाहूल लागल्यामुळे या सुमारास झाडे नवीन पालवीने व विविध रंगी फुलांनी रंगीबेरंगी दिसत असतात. हवाही उष्ण झालेली असते. अशावेळी थंड पाणी अंगावर उडविणे सुखदायक असते. त्यामुळे रंगपंचमी हा सण सुरु झाला.

कुसुंबीच्या फुलांपासून काढलेल्या रंगाचे पाणी करून तसेच केशराचे पाणी करून ते एकमेकांच्या अंगावर उडविले जात असे. पेशवाईत तर हा सण शाही इतमामाने साजरा केला जात असे. रंगाच्या पिचका-या भरभरून हत्तीवरून गुलाल आणि इतर कोरडया रंगाची उधळण केली जात असे. आजकाल विविध प्रकारचे रंग पाण्यात कालवून ते एकमेकांवर उडवितात. विशेषत: तरुण स्त्री-पुरुषांना एकत्र येण्याची व थट्टा-मस्करी करण्याची संधी या सणामुळे मिळते. परंतु कालांतराने अश्लील शब्द उच्चारून शंखध्वनी करणे यासारख्या विकृत गोष्टीही या उत्सवात शिरल्या. आजकाल एखाद्या हौदातील पाण्यात रंग टाकून एकमेकांना त्यात डुबवून हसत खेळत या सणाची मजा लुटली जाते.

धूलिवंदन (धुळवड) हा होळीच्या दुस-या दिवशी फाल्गुन वद्य प्रतिपदेला साजरा केला जाणारा रंगांचा आणि आनंदाचा सण आहे. या दिवशी होळीची राख आणि माती अंगाला लावून पृथ्वीला वंदन करण्याची पद्धत आहे. महाराष्ट्रात या दिवशी एकमेकांवर रंगपाणी आणि चिखल उडवून वसंत ऋतूचे स्वागत केले जाते. तसेच परस्परांतील मतभेद विसरून हा सण साजरा केला जातो. होळी पौर्णिमेच्या दुस-या दिवशी फाल्गुन वद्य प्रतिपदेस सकाळी धुळवड साजरी करतात. पहिल्या दिवशी पेटवलेल्या होळीच्या पवित्र राखेला वंदन करून ती अंगाला लावतात ज्याला 'धूलिवंदन' म्हणतात.

काही ठिकाणी विशेषतः ग्रामीण भागात चिखल उडवून धुळवड खेळली जाते. हा सण रंगप्रेम आणि वसंत ऋतूचे प्रतीक असून समाजातील बंध म्हणजेच सामाजिक एकता मजबूत करतो. पौराणिक संदर्भानुसार हिरण्यकश्यपूवर विष्णूच्या नरसिंह रुपाने मिळवलेल्या विजयाचे अर्थात वाईटावर चांगल्याचा विजयाचे हे स्मरण आहे. यामागिल वैज्ञानिक महत्त्व असा आहे की, हा सण रंगांचा वापर करून आरोग्यासाठी आणि वसंत ऋतूच्या बदलांमध्ये शरीरातील दोष संतुलित करण्यासाठीही साजरा केला जातो. एकंदरीत धूलिवंदन हे होळीच्या उत्सवाचा अविभाज्य भाग असून तो आनंदरंग आणि सामाजिक सलोख्याचा दिवस आहे.

रंग उधळले आसमंती
गोकुळ धुंद झाला
राधा-कृष्णाचा प्रेम स्नेह
चोहीकडे दरवळला

**शब्दस्पर्शी-सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली, यवतमाळ**
**भ्रमणध्वनी-७०५७१८५४७९**

# राज्याची अर्थव्यवस्था सुदृढ याचे स्वागतच; मग विदर्भातील युवावर्ग रोजगार व शिक्षणासाठी पुण्या-मुंबईत किंवा देशाच्या इतर भागात का जातात?

राज्याची अर्थव्यवस्था देशात अव्वल आहे याचा अभिमान आम्हा सर्वांनाच आहे आणि असायलाच हवा.याचे जितके कौतुक कराल तितके कमी आहे,त्यामुळे याचे स्वागतच. राज्य सरकारने सन २०२९ पर्यंत एक लाख कोटी डॉलरच्या अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट सरकारने निर्धारित केले असून,राज्याची अर्थव्यवस्था आताच ५१ लाख कोटींवर पोहोचली आहे. अशी माहिती माननीय मुख्यमंत्री देवेन्द्रजी फडणवीस यांनी दिनांक २६ फेब्रुवारी २०२६ ला विधानसभेत दिली.याचे मनापासून स्वागत. कारण राज्याच्या अर्थव्यवस्थेत सुधारणा होणे म्हणजे देशाच्या विकासाला हातभार लावणे होय. परंतु देशाचा केंद्र बिंदू आणि राज्याची उपराजधानी नागपूर आहे ही बाब सरकारने लक्षात ठेवली पाहिजे.याच अनुषंगाने माझ्यामते राज्यातील व विदर्भातील युवावर्गानी रोजगारासाठी नागपूरमध्ये धाव घ्यायला पाहिजे होती, परंतु आज नागपूरसह विदर्भातील युवावर्ग रोजगारासाठी पुण्या-मुंबईत किंवा इतर राज्यात का धाव घेत आहे याचा गांभीर्याने सरकारने विचार करण्याची गरज आहे.आज नागपूरचा सुध्दा विकास झपाट्याने होत यात दुमत नाही. परंतु आयटी सेक्टर किंवा इतर फिल्डमधील युवकांना आपले घरदार सोडून दुसऱ्या शहरात धाव घ्यावी लागते ही नागपूर सारख्या उपराजधानीची शोकांतिकाच म्हणावी लागेल.उदाहरण द्यायचे झाले तर,आज इंजिनिअरिंग केलेल्या विद्यार्थ्यांना पुण्या-मुंबईत ५० हजारांच्यावरती पगार मिळतो आणि उपराजधानी सारख्या नागपूर शहरात १५ ते २० हजार रुपये पगार मिळतो अशी तफावत का? राज्य एकच आहे,शिक्षण एकच आहे, पदवी एकच आहे परंतु युवा वर्गाच्या भविष्यासोबत खिलवाड का? असे अनेक प्रश्न उपस्थित होतात. आज नागपूरातीलच नाही तर संपूर्ण विदर्भातील मोठ्या प्रमाणात युवावर्ग नौकरीच्या शोधासाठी पुण्या-मुंबईकडे धाव घेत आहे ही कल्पना सरकारला का नाही? यावरून स्पष्ट होते की,आज जो युवावर्ग इंजिनिअर झालेला आहे त्याच्या पसंतीचा जॉब किंवा नौकरी त्याला नागपूरात मिळत नसावी किंवा त्याच्या शिक्षणानुसार त्याला पगार मिळत नसावा म्हणूनच नागपूरसह विदर्भातील युवावर्ग राज्यातील पुणा-मुंबई किंवा इतर भागांची पसंत करत असावेत.आपली संस्कृती सांगते की, मुलांनी आई-वडीलांचा सांभाळ केला पाहिजे. अहो ज्याठिकाणी आई-वडील रहातात त्या ठिकाणी जर मुलांना योग्य आणि त्यांच्या शिक्षणानुसार नौकरीच ( जॉब ) मिळत नसेल तर त्याला नाईलाजास्तव जॉबसाठी आई-वडिलापासुन दुर जावे लागते आणि याला जबाबदार सरकार असल्याचे मी समजतो. अहो विदर्भातील मुलांना त्यांच्या मनालायक नौकरी मिळत नाही किंवा पगार नाही,मग सहाजीकच आहे त्यांना आई वडील आणि घरदार सोडून बाहेर जावेच लागेल.पहिलेच राज्यांमध्ये बेरोजगारी मोठ्या प्रमाणात वाढत आहे आणि आता त्यात भर घालण्याचे काम एआय करीत आहे यामुळे काही काळात आयटी सेक्टर सुद्धा धाराशाही होण्याची होण्याच्या मार्गावर असल्याची दाट शक्यता वर्तवण्यात येत आहे.असेही सांगण्यात येते की, पुढील काही वर्षांत महाराष्ट्र जगातील १३ वी अर्थव्यवस्था होईल असे भाकीत माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वर्तविले आहे ही अत्यंत आनंदाची व गौरवास्पद बाब आहे.परंतु संपूर्ण महाराष्ट्र रोजगारीच्या बाबतीत सक्षम झाला आहे का, सर्वांना मुलभूत सुविधा उपलब्ध आहेत का?याचा विचार सरकारने करने गरजेचे आहे.आज आपण महाराष्ट्राची अर्थव्यवस्था सुदृढ आहे असे आपण सांगतो. परंतु राज्यातील विदर्भासह अनेक क्षेत्रातील युवा वर्ग शिक्षणासाठी व नौकरीसाठी आपले मुळ क्षेत्र सोडून राज्याच्या इतर भागात किंवा देशाच्या इतर भागात जातो याचे मुख्य कारण काय याचाही अभ्यास राज्याच्या अर्थतज्ज्ञांनी करण्याची गरज आहे.असे सांगितले जाते की परदेशातील थेट परकीय गुंतवणूकीत महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे,मग असे असुनही राज्यातील काही भागांतील युवावर्गांना समाधानकारक जॉब व पगार का मिळत नाही? देशातील एकूण गुंतवणूकीपेक्षा ३९ टक्के परदेशी गुंतवणूक महाराष्ट्रात असल्याचे सांगितले जाते,मग राज्यातील संपूर्ण भागात भरघोस रोजगार निर्मिती का नाही? असे अनेक प्रश्न आजही राज्याच्या जनतेपुढे उपस्थित होतात.त्यामुळे सरकारने अर्थव्यवस्थेप्रमाणे रोजगार निर्मिती व वाढत्या महागाईनुसार रोजगारांना पगार दिले पाहिजे. सरकारने फक्त आश्वासने किंवा घोषणाबाजी करून चालणार नाही तर या संपूर्ण गोष्टी कृतीत बदलविल्या पाहिजे. त्याचप्रमाणे राज्याचा विकास भरभराटीला न्यायचा असेल तर सर्वप्रथम वाढत्या महागाईवर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.कारण महागाई सर्वच गोष्टींमध्ये अडचण निर्माण करीत असते.राज्यातील १० टक्के सरकारी कर्मचाऱ्यांना वाढत्या महागाईनुसार डीए मिळत असतो याचे स्वागतच,परंतु त्याचा परिणाम ८० टक्के शेतकरी, शेतमजूर, गरीब, सर्वसामान्यांना भोगावा लागतो.त्यामुळे सरकारने सर्वप्रथम महागाईवर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे.आपण आपल्या अर्थव्यवस्थेनुसार राज्याचा विचार केला तर आपण सर्वच बाबतीत सक्षम असायला पाहिजे होते. परंतु आजही राज्याच्या अती दुर्गम भागात मुलभूत सुविधा उपलब्ध नाहीत.यामुळेच आपल्याला अती दुर्गम भागात आजही कुपोषणाचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते. अशाप्रकारे आजही राज्यात अनेक मोठमोठ्या समस्या आहेत यावर सरकारने लक्ष केंद्रित केले पाहिजे. जय हिंद.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर.**

# मराठवाड्याचा शैक्षणिक चेहरा डॉ. जनार्दन वाघमारे सर

मराठवाड्यासारख्या भागाला मागास भाग म्हणून हिणवले जात होते. नैसर्गिकदृष्ट्या, आर्थिकदृष्ट्या, सामाजिकदृष्ट्या, शैक्षणिकदृष्ट्या, राजकीयदृष्ट्या, मागासलेला भाग अशी मराठवाड्याची १९८० च्या दशकात पर्यंत ओळख होती. अशा मागास म्हणून हिणवल्या गेलेल्या मराठवाड्यात छत्रपती शिक्षण संस्थेच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या राजर्षी शाहू महाविद्यालयाने प्राचार्य डॉ. जे. एम. वाघमारे सरांच्या नेतृत्वाखाली अशी शैक्षणिक गरुड झेप घेतली अशी शैक्षणिक क्रांती केली की पाहता पाहता लातूर ही शिक्षणाची पंढरी म्हणून नावारूपाला आले .लातूर हा शैक्षणिक पॅटर्न बनला. लातूर शिक्षणाचे हब बनले. सर्वच अर्थाने मागासलेपणाचा शिक्का लागलेल्या मराठवाड्यात, पाण्याचं दुर्भिक्ष असलेल्या लातूर परिसरात डॉ. गोपाळराव पाटील यांच्या कल्पकतेतून डॉ. जनार्दन वाघमारे सर यांच्या नेतृत्वातून राजर्षी शाहू महाविद्यालय सुरू करण्यात आले. अगदी सुरुवातीला दगडी भिंतीच्या गोडाऊनमध्ये हे महाविद्यालय होते. कालांतराने शिक्षणप्रेमी संस्थाचालक , कल्पक नियोजन, काहीतरी नवीन करण्याची जिद्द, व प्राचार्यांच्या रूपाने डॉ. जे .एम .वाघमारे सरांच्या रूपाने मिळालेले खंबीर नेतृत्व याच्या जोरावर राजर्षी शाहू महाविद्यालयाने अल्पावधीतच आपली गुणवत्ता सिद्ध केली. हजारो डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक, प्राध्यापक, खेळाडू, कलावंत, प्रशासक ,निर्माण करणारी फॅक्टरी म्हणून या महाविद्यालयाचा नावलौकिक झाला. या महाविद्याच्या यशात फाउंडर प्राचार्य म्हणून डॉ. जे. एम. वाघमारे सरांचे अत्यंत महत्त्वाचे योगदान होते .त्यांना त्या काळातील उपप्राचार्य डॉ. अनिरुद्ध जाधव सर डॉ. रावसाहेब कावळे सर व सहकार्यांनी मदत केली. म्हणून पाहता पाहता राजर्षी शाहू महाविद्यालयाचा नावलौकिक संपूर्ण राज्यांमध्ये नव्हे तर देशात झाला. अगदी १९८० ते २०१० पर्यंत राज्याच्या कानाकोपऱ्यातून डॉक्टर होण्यासाठी इंजिनिअर होण्यासाठी हजारो विद्यार्थी लातूरच्या शिक्षण पंढरीमध्ये दाखल होत होते .तज्ञ शिक्षकवृंद ,कल्पक संस्थाचालक, व्हिजन असलेले प्राचार्य, सेवा समर्पण व संयमी वृत्तीचे शिक्षकेतर कर्मचारी, उत्तम नियोजन, तज्ञ व्यवस्थापन, व गुणवंत शिक्षकांच्या मदतीने शिक्षणात अहोरात्र गाढून घेतलेले असंख्य विद्यार्थी, अशी कर्मयोगाची परंपरा डॉ. जे .एम.वाघमारे सरांनी निर्माण केल्यामुळे मराठवाड्यातच नव्हे तर संपूर्ण राज्य आणि देशांमध्ये लातूर पॅटर्नची आगळीवेगळी ओळख निर्माण झाली. संपूर्ण राज्यात व देशात ( छउ)चा बाउ केला जात असताना त्यांनी राजर्षी शाहू महाविद्यालयाला ++ दर्जा प्राप्त करून दिला. एकूणच काय तर गुणवत्तेचा ध्यास, गुणवत्तेची आस, गुणवत्तेची कास, व गुणवत्तेचा विकास या चतुसूत्रीच्या माध्यमातून शिक्षण क्षेत्रामध्ये लातूर पॅटर्न ही स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली.याला साथ संगत करताना शेजारच्या दयानंद महाविद्यालयाने व महात्मा बसवेश्वर महाविद्यालयांमध्येही गुणवत्तापूर्ण बदल झाले .त्यातून लातूर पॅटर्नच्या यशात चार चांद लागले. कित्येक वर्ष शाहू व दयानंद महाविद्याचे असंख्य विद्यार्थी गुणांनुक्रमे विज्ञान व वाणिज्य शाखेमध्ये स्वतःचा धबधबा निर्माण करून होते. सोबत महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाने कला शाखेत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. पाहता पाहता हे गुणवत्तेचे लोन इतर शाळा महाविद्यालयात व शिकवणी वर्गापर्यंत पोहोचले, त्यातून लातूर चा शिक्षण क्षेत्रात दबदबा निर्माण झाला. आज देशाच्या कानाकोपऱ्यात लातूरचे विद्यार्थी स्वतःचे गुणवत्तापूर्ण , मेहनत करणारे, अभ्यासू, व कामातून स्वतःच वेगळं अस्तित्व निर्माण करणारे कर्मचारी म्हणून ओळख निर्माण करत आहेत. विनोद नव्हे तर ही वास्तविकता आहे, की एखादा कर्मचारी हुशार असेल, प्रामाणिक असेल, समर्पित असेल, इमाने इतबारे काम करत असेल.. तर तुम्ही लातूरचे आहात का..? म्हणून विचारले जाते,याचे सारे श्रेय लातूरच्या शैक्षणिक पॅटर्नचे जनक डॉ. जे.एम. वाघमारे सरांना तसेच शाहू कॉलेजला, दयानंद कॉलेजला,व बसवेश्वर कॉलेजला व शहरातील इतर गुणवत्तापूर्ण शिक्षण संस्थांना, शाळा महाविद्यालयाला जाते. म्हणून डॉ. जे .एम.वाघमारे सर मराठवाड्याचा शैक्षणिक चेहरा म्हणून महाराष्ट्राच्या शिक्षण पटलावर नावारूपाला आले. मराठवाड्याच्या शिक्षणाचा चेहरा डॉ. जे.एम. वाघमारे सर हा शब्दप्रयोग मी जाणीवपूर्वक करत आहे, कारण चेहरा व मुखवटा यात मूलभूत फरक असतो. चेहरा नैसर्गिक असतो. तर मुखवटा हा कृत्रिम असतो. चेहरा व मुखवटा यात अर्थ, स्वरूप ,प्रतिकात्मकता, आशयात्मकता या सर्व अंगाने फरक असतो. म्हणजे चेहरा नैसर्गिक असतो, तर मुखवटा कृत्रिम असतो. मुखवटा धारण करावा लागतो, मुखवटा स्वीकारावा लागतो. चेहरा जन्मजात असतो ,तर मुखवटा बाहेरून चिटकवलेला असतो. चेहरा खरी ओळख दर्शवतो, तर मुखवटा खरी ओळख लपवतो, चेहऱ्यावर भाव भावना संवेदना खऱ्या असतात. चेहरा माणसाची खरी ओळख असतो, तर मुखवटा माणसाची बनावट ओळख असते. चेहरा उघडा करता येतो पण वास्तवता आहे तीच राहते. मुखवटा उघडा केला तर वास्तवता संपूर्ण बदलून जाते. चेहरा सत्याशी जवळीक सांगतो, तर मुखवटा आभासी असतो. या चेहरा व मुखवट्या मागील मूलभूत फरकावरून मला हेच सांगायचे आहे की डॉ. जे.एम. वाघमारे सर हे मराठवाड्यातील शिक्षणाचा खरा चेहरा होते. कारण त्यांनी केवळ शिक्षण क्षेत्रात शिस्त निर्माण केली नाही. केवळ गुणवत्तापूर्ण विकास केला नाही, तर वास्तविक जीवनातही त्यांनी त्यांच्या गुणात्मक चेहऱ्याच्या जोरावर, साहित्य ,कला ,राजकारण, समाजकारण ,सांस्कृतिक जीवनाच्या माध्यमातून नवनवीन आदर्श निर्माण केले. नव्या जाणीव निर्माण केल्या. नवीन मूल्य रुजवले. म्हणून तर त्यांनी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे पहिले कुलगुरू म्हणून आगळी वेगळी ओळख निर्माण केली. १९९४ मध्ये निर्माण झालेल्या या विद्यापीठाचे पहिले कुलगुरू म्हणून विद्यापीठाला त्यांनी सुंदर अशी इमारत दिली. प्रशासकीय पारदर्शकता दिली. प्रशासकीय गतिमानाचा प्रस्थापित केली. विविध संकुलाची उभारणी केली. गुणवत्तेचा ध्यास घेतला. ग्रामीण विद्यार्थ्यांना, बहुजनांना, वंचितांना, गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून दिले. शिक्षण हे सामाजिक न्यायाचे साधन मानले. आचार ,विचार ,उच्चार व कृतीतून लोकशाही मूल्यांचे जतन आणि संवर्धन केले. १९९४ ते १९९९ पर्यंत विद्यापीठाला परिपूर्ण बनवण्यासाठी त्यांनी कार्य केले. सोबतच त्यांचे साहित्यिक योगदान त्यांच्या विचाराची उंची दर्शवते. त्यांची प्रतिभा व प्रगल्भता त्यांच्या साहित्यातून डोकावते. अमेरिकन निग्रो –साहित्य व संस्कृती महाराष्ट्रातील राजकारण व समाजकारण हाक आणि आक्रोश शिक्षण– समाज परिवर्तन व राष्ट्रविकास चिंतन एका कुलगुरूचे आजचे शिक्षण स्वप्न व वास्तव मुठभर माती आत्मकथा इत्यादी पुस्तकाच्या माध्यमातून ग्रंथ व आत्मचरित्राच्या माध्यमातून डॉ. जे.एम .वाघमारे सरांनी कायमच समाज प्रबोधनाचा व समाज परिवर्तनाचा विचार लोकांसमोर मांडला. या सोबतच शेकडो व्याख्याने व राज्यसभेचा खासदार म्हणून भारताच्या संसदेत त्यांनी केलेले कार्य अत्यंत समाज उपयोगी आणि राष्ट्र उभारणीचे होते. म्हणून या सर्व पार्श्वभूमीवर मराठवाड्यातील लोकांमध्ये असणाऱ्या गुणवत्तेचा ,बुद्धिमत्तेचा, कल्पकतेचा, विद्वत्तेचा, प्रज्ञावंताचा, प्रशासकाचा ,राज्य व देशाच्या पटलावर व्यक्त होणारा खरा चेहरा जनमानसासमोर आणण्याच्या भावनेतून नम्रपणे एकच भाव मनामध्ये उमटला तो म्हणजे मराठवाड्याच्या शिक्षणाचा चेहरा डॉ. जे. एम .वाघमारे सर होय..!!

**प्रा .डॉ. शशिकांत तोळमारे**
**श्री योगानंद स्वामी कला महाविद्यालय**
**वसमत जिल्हा हिंगोली. ९४२१०८८२६२**

## केज शहरात लाइफ केअर मेडिकलचे उद्घाटन संपन्न



केज/प्रतिनिधी–केज शहरात लाइफ केअर मेडिकलचे उद्घाटन नुकतेच संपन्न झाले.

बौद्धवासी गंगाधर (तात्या) शिरसट यांची कन्या प्राजक्ता शिरसट हिने आपल्या वडिलांचे स्वप्न साकारण्यासाठी हा आरोग्याशी निगडित व्यवसाय उभारला आहे असे मत श्रीमती ज्योती गंगाधर शिरसट यांनी बोलताना व्यक्त केले. तर या उद्घाटन प्रसंगी बोलत होत्या.

सर्वप्रथम ज्योती शिरसट, ऋषिकेश शिरसट, प्राजक्ता सिरसट, ऋतुजा सिरसट यांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध,महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर व बौद्धवासी गंगाधर शिरसट यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून धूपदीपाने पूजन करण्यात आले. बौद्धाचार्य नंदकुमार मस्के यांनी बुद्ध वंदना ग्रहण केली, नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड, आई ज्योती शिरसट व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते फीत कापून लाईफ केअर मेडिकलचे भव्य उद्घाटन करण्यात आले. यावेळी सिरसट परिवाराच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

प्राजक्ता शिरसट हिचे वडील बौद्धवासी गंगाधर शिरसट यांच्या मृत्यूनंतर अतिशय प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षण घेऊन आपल्या वडिलांचे स्वप्न साकार करण्यासाठी जिद्द व मेहनत घेऊन आई, भाऊ, लहानी बहीण,आजी–आजोबा व मामा–मामी परिवार आणि सर्व शिरसट परिवारातील चुलते–चुलती या सर्वांच्या सहकार्याने लाईफ केअर मेडिकल हा व्यवसाय उभारला आहे.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करून बौद्धवासी गंगाधर (तात्या) शिरसट यांच्या आठवणींना उजळा देत प्राजक्ता हिच्या लाईफ केअर मेडिकल व्यवसायाला शुभेच्छा दिल्या, व सर्वांनी या मेडिकलवर औषध गोळ्या सह स्टेशनरी साहित्य खरेदी करावे. असे आवाहन केले.

यावेळी नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड, नगरसेविका पद्मिनी अक्का शिंदे, बौद्धाचार्य नंदकुमार मस्के, सामाजिक कार्यकर्ते अशोक गायकवाड, पत्रकार तात्या गवळी, पत्रकार विवेक बनसोड, धनराज भालेराव, मसाजी (भाऊ) शिनगारे, मेजर विश्वनाथ शिरसट, उद्योजक सचिन वेदपाठक, किरण जोगदंड, बालासाहेब जोगदंड, चंद्रकांत शिनगारे, विमल जोगदंड, बबीता मस्के, मीरा गवळी, प्रमिला मस्के, दैवशाला शिरसट, राज्जाक सय्यद, दिलीप बनसोडे, मनोज मस्के, ऋतिक सोनवणे यांचेसह महिला, नागरिक आणि शिरसट परिवाराह मित्र परिवारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाल शिरसट यांनी केले तर उपस्थित त्यांच्या आभार गणेश कांबळे यांनी मानले.

## स्वामी विवेकानंद विद्या मंदिर (प्रा) केज मध्ये राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा



केज/प्रतिनिधी–भारताचे नोबेल विजेते प्रसिद्ध वैज्ञानिक डॉ.सी. व्ही. रमण यांच्या सन्मानार्थ राष्ट्रीय विज्ञान दिन केज शहरातील नामांकित स्वामी विवेकानंद विद्या मंदिर केज येथे साजरा करण्यात आला. प्रसंगी प्रमुख उदघाटक म्हणून प्रा. डॉ. हनुमंत सौदागर , प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. तिडके उपस्थित होते. विज्ञान प्रयोग आणि सत्यावर चालणारे शास्त्र आहे आणि विज्ञान युगात सर्वांनी वैज्ञानिक दृष्टी बाळगावी असे मत उदघाटन प्रसंगी डॉ सौदागर यांनी केले.विज्ञान प्रदर्शनात शाळेतील विद्यार्थ्यांनी आपापले प्रयोग सादर केले तसेच सायन्स ऑलिम्पियाड फाउंडेशन स्पर्धा परीक्षे अंतर्गत विजेत्या विद्यार्थ्यांना सन्मानपत्र, मेडल्स देऊन गौरविण्यात आले. विज्ञान विषय शिक्षक एम. गिरी सर यांच्या नियोजनात शालेय पातळीवरील विज्ञान प्रदर्शन यशस्वी झाले प्रयोग सादरीकरणातून भविष्यात उत्कृष्ट वैज्ञानिक बनतील अशी अध्यक्षीय भाषणात कार्यक्रमाचे अध्यक्ष शितोळे यांनी अपेक्षा व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री. मंगरूळकर यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. चोले यांनी केले. आजच्या राष्ट्रीय विज्ञान दिनाचे शाळेत यशस्वी नियोजन व संयोजन करण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन श्री. गिरी व श्री. पूजदेकर यांनी केले.

तसेच संस्थेचे अध्यक्ष, अंकुश अण्णा इंगळे साहेब व सचिव सन्माननीय गदळे सर यांनी विद्यार्थ्यांच्या प्रयोगांची पाहणी करून शुभेच्छा दिल्या. विज्ञान दिवस शाळेत यशस्वी करण्यासाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले

## केज शहरात डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान व केज नगरपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य स्वच्छता अभियान संपन्न




केज/प्रतिनिधी–केज शहरात डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान,रेवदंडा (हतांडा) ता.अलिबाग जि. रायगड व केज नगरपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य स्वच्छता अभियान संपन्न झाले आहे. लातूर, धाराशिव, सोलापूर, बीड जिल्ह्यातील सुमारे २ हजार स्वच्छतादूत हे रस्त्यावर उतरून या भव्य स्वच्छता अभियानात सहभागी झाले होते.

डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने संबंध राज्यभर विविध उपक्रम राबवले जात आहेत. त्याच अनुषंगाने रविवार दिनांक १ मार्च २०२६ रोजी सकाळी ठीक ७–०० वाजता शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे अंबा साखर कारखान्याचे चेअरमन रमेशराव आडसकर, राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा गटनेते हारूणभाई इनामदार, नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड, नगरसेविका सौ. पद्मिनी अक्का शिंदे, मुख्याधिकारी अजित ढोपे, कार्यालयीन अधीक्षक रमाकांत सोनकांबळे, सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले यांच्या हस्ते भव्य स्वच्छता मोहिमेस सुरुवात करण्यात आली. यावेळी डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या सदस्यांच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

सकाळी ७ ते ११ या वेळेत तहसील कार्यालय परिसर, न्यायालय परिसर, छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसर, पंचायत समिती कार्यालय परिसर, शासकीय विश्रामगृह परिसर, बसस्थानक परिसर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक परिसर, जय भवानी चौक परिसर, मंगळवार पेठ कॉर्नर परिसर, संत भगवान बाबा चौक परिसर, महात्मा ज्योतिबा फुले चौक परिसर, बालाजी मंदिर परिसर, हनुमान मंदिर परिसर, आंबेजोगाई रोड, बीड रोड, कळंब रोड, धारूर रोड, उमरी रोड यासह शासकीय कार्यालय व कार्यालयाचे परिसर आणि शहरातील मुख्य रस्त्यासह विविध ठिकाणी स्वच्छता मोहीम राबवण्यात आली. अवघ्या चार तासांमध्ये जवळपास २ हजार स्वच्छता दूताने संपूर्ण शहर चकाचक केले.

केज शहरात सकाळी ७–०० वाजता स्वच्छतादूत रस्त्यावर उतरून हातामध्ये झाडू, फावडे यासह विविध अवजारे, साहित्य घेऊन नीसंकोचपणे केज शहर स्वच्छ केले. या प्रतिष्ठानच्या सदस्यांना हाता मध्ये हातमोजे, मास्क इत्यादी साहित्य पुरविण्यात आले होते. घंटागाड्या, ट्रॅक्टर, जेसीबी, अग्निशामक दलाची गाडी केज नगरपंचायत च्या वतीने उपलब्ध करून देण्यात आले होते.

या मोहिमेत सध्या रमजान ईद निमित्त रोजे चालू असताना देखील गटनेते हारूणभाई इनामदार हे स्वतः सहभागी होऊन या अभियानात नियोजन करत होते तर नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड, मुख्याधिकारी अजित ढोपे व त्यांचे सहकारी आणि नगरसेवक, केज नगरपंचायतचे कर्मचारी सहभागी होते त्याचबरोबर केज येथील सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार बांधव देखील सहभागी झाले होते.

या अभियानात सदस्यांनी चार तासांमध्ये मोठ्या प्रमाणात सुका कचरा व ओला कचरा जमा करून बीड रोड वरील कचरा डेपो येथे सदरचा कचरा हा संकलित केला. सदर स्वच्छता अभियानाचे नियोजन हे अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने करण्यात आले होते.

सदर प्रतिष्ठानचे सदस्य हे स्वच्छता मोहीमेत सहभागी होत असताना स्वतःच्या घरीहुन येता वेळी पाणी व जेवण आणत आहेत. सदस्य हे कुठल्याच प्रकारचे सदर मोहीम राबवत असताना चहा,पाणी अथवा नाष्टा आणि जेवण हे संबंधितांकडून घेत नाहीत किंवा करत नाहीत ते स्वतःचे आणलेले जेवण हे आपल्या गावी म्हणजे घराच्या रस्त्याने जात असताना जेवण करत आहेत. या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

